# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** **विकास योजना नागपूर (सूधारीत)**

**{ नगर रचना विभाग }** मौजा-वाठोडा येथील खसरा क्र. २६ पैकी, २७ ते ४० पैकी १.१८९२ हेक्टर क्षेत्राची आरक्षण क्र. ME-५७ शॉंपीग सेंटरकरीताची (SC) राखीव जागा सिव्हीक सेंटर/ कम्युनिटी हॉल व कल्चरल सेंटर करीता आरक्षित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस- २४९६-२६४३-प्र.क्र. ३०० (अ) -९७ - नवी -९, दि ०७.०१.२००० अन्वये भागशः मंजुर झालेली असून ती दि. ०१.०३.२००० पासून अंमलात आलेली आहे व पुर्नप्रसिध्द विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र.-२००/२०००/-नवि-९, दि. १०.०९.२००१ रोजी मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६/नवि-९, दि २७.०२.२००२ सात योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषीत केलेले होते. तथापी, शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४/नवि-९, दि.२७.०८.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील ७ योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१९/१४१९/प्र.क्र.-१५४(भाग-१)/२०१९/नवि-९, दि. ०९.०४.२०२१ नूसार स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील भाग वगळता ७ योजनेकरीता नागपूर सूधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषित केले आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सुधारीत मध्ये मौजा-वाठोडा येथील खसरा क्र. २६ पैकी, २७ ते ४० पैकी १.४५९२ हेक्टर क्षेत्राची जागा आरक्षण क्र. ME-५७ शॉंपीग सेंटर करीताची राखीव असून उक्त आरक्षित जागेकरीता नागपूर सूधार प्रन्यास हे समुचित प्राधिकरण आहे. तसेच सदर जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. शासनाने निर्णय क्र. टिपीएस-२४२०/८०६/ प्र.क्र. ९४/२०२२/नवि-९, दि.२०.०५.२०२५ अन्वये मौजा- वाठोडा येथील आरक्षण क्र. ME-३१ टेलिफोन ते ME-५८ खेळाचे मैदान पर्यंतच्या १८.०० मी. रूंद विकास योजना रस्त्याऐवजी तसेच खसरा क्र. १७ व १८ मधून रिंगरोडला जोडणाऱ्या १८.०० मी. रूंद विकास योजना रस्त्याऐवजी ३६.०० मी रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणेच्या फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(२) अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे. उक्त ३६.०० मी रूंद विकास योजना रस्त्यामुळे आ.क्र. ME-५७ शॉंपीग सेंटर करीता राखीव जागेमधील सुमारे ०.२७ हे क्षेत्राची जागा बाधीत होत असल्याने, आता आ.क्र. ME-५७ शॉंपीग सेंटर करीताचे राखीव क्षेत्र १.१८९२ हेक्टर एवढे शिल्लक राहते.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सूधारीत मध्ये मौजा-वाठोडा येथील खसरा क्र. २६ पैकी, २७ ते ४० पैकी आरक्षण क्र. ME-५७ शॉंपीग सेंटरकरीता शिल्लक राखीव १.१८९२ हे. क्षेत्राच्या आरक्षणाचे नामाभिधानात बदल करून सिव्हीक सेंटर/कम्युनिटी हॉल व कल्चरल सेंटर करीता राखीव ठेवणेबाबत मंजूर विकास योजना सूधारीत मध्ये बदल करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रशासकीय ठराव पारित करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उक्त फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेकरीता प्रस्तावित आहे.

याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपूर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप / हरकतीवर सूनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तदनंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजूरी देण्याचा विषय विचारात घेणे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 55/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 20/10/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा-वाठोडा येथील खसरा क्र. २६ पैकी, २७ ते ४० पैकी १.१८९२ हेक्टर क्षेत्राची आरक्षण क्र. ME-५७ शॉंपीग सेंटरकरीताची (SC) राखीव जागा सिव्हीक सेंटर/ कम्युनिटी हॉल व कल्चरल सेंटर करीता आरक्षित करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस- २४९६-२६४३-प्र.क्र. ३०० (अ) -९७ - नवी -९, दि ०७.०१.२००० अन्वये भागश: मंजुर झालेली असून ती दि. ०१.०३.२००० पासून अंमलात आलेली आहे व पुर्नप्रसिध्द विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र.-२००/२०००/-नवि-९, दि. १०.०९.२००१ रोजी मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि. २१.०९.२००१ पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४०१-८८५-प्र.क्र.-७६/नवि-९, दि २७.०२.२००२ सात योजनेकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषीत केलेले होते. तथापी, शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस-२४१९-१४१९-प्र.क्र.-१५४/नवि-९, दि.२७.०८.२०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील ७ योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१९/१४१९/प्र.क्र.-१५४(भाग-१)/२०१९/नवि-९, दि. ०९.०४.२०२१ नूसार स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील भाग वगळता ७ योजनेकरीता नागपूर सूधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण घोषित केले आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सुधारीत मध्ये मौजा-वाठोडा येथील खसरा क्र. २६ पैकी, २७ ते ४० पैकी १.४५९२ हेक्टर क्षेत्राची जागा आरक्षण क्र. ME-५७ शॉंपीग सेंटर करीताची राखीव असून उक्त आरक्षित जागेकरीता नागपूर सूधार प्रन्यास हे समुचित प्राधिकरण आहे. तसेच सदर जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे. शासनाने निर्णय क्र. टिपीएस-२४२०/८०६/ प्र.क्र. ९४/२०२२/नवि-९, दि.२०.०५.२०२५ अन्वये मौजा- वाठोडा येथील आरक्षण क्र. ME-३१ टेलिफोन ते ME-५८ खेळाचे मैदान पर्यंतच्या १८.०० मी. रूंद विकास योजना रस्त्याऐवजी तसेच खसरा क्र. १७ व १८ मधून रिंगरोडला जोडणाऱ्या १८.०० मी. रूंद विकास योजना रस्त्याऐवजी ३६.०० मी रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणेच्या फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(२) अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे. उक्त ३६.०० मी रूंद विकास योजना रस्त्यामुळे आ.क्र. ME-५७ शॉंपीग सेंटर करीता राखीव जागेमधील

सुमारे ०.२७ हे क्षेत्राची जागा बाधीत होत असल्याने, आता आ.क्र. ME-५७ शॉपीग सेंटर करीताचे राखीव क्षेत्र १.१८९२ हेक्टर एवढे शिल्लक राहते.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सूधारीत मध्ये मौजा-वाठोडा येथील खसरा क्र. २६ पैकी, २७ ते ४० पैकी आरक्षण क्र. ME-५७ शॉपीग सेंटरकरीता शिल्लक राखीव १.१८९२ हे. क्षेत्राच्या आरक्षणाचे नामाभिधानात बदल करून सिव्हीक सेंटर/कम्युनिटी हॉल व कल्चरल सेंटर करीता राखीव ठेवणेबाबत मंजूर विकास योजना सूधारीत मध्ये बदल करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रशासकीय ठराव पारित करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उक्त फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणेकरीता प्रस्तावित आहे.

याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपूर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप / हरकतीवर सूनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तदनंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजूरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.